रजि. नं. ए-१६

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे



## द्विवार्षिक अहवाल : सन २००२-०४

प्रमुख कार्यालय : ५७६, गुरुवार पेठ, पुणे - ४११ ०४२. फोन : २४४७२३४०
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे - ४११ ०४२.



दि. २०/१०/२००२ रोजी
नेत्रचिकित्सा शिबिर प्रसंगी
रुग्णास तपासताना
डॉ. वर्षा वाळवेकर सोबत
सर्वश्री. अनिल पवार, अशोकसा
रंगापुरे, डॉ. प्रकाश त्रिमल,
संदिप चव्हाण, राजेंद्र झाड,
अंबुसा मेंगजी, श्रीकांत कटारे



दि. २४/८/२००३ रोजी
आरोग्य चिकित्सा शिबिर
उद्घाटन प्रसंगी
मा. आमदार दिपकजी पायगुडे
यांचे स्वागत करताना ट्रस्टचे
उपाध्यक्ष श्री. अशोकसा रंगापुरे,
सोबत डॉ. मंदार देव व ट्रस्टचे
सचिव श्री. संदिप चव्हाण



दि. २४/८/२००३ रोजी
मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे
उद्घाटन प्रसंगी
मा. आमदार दिपकजी पायगुडे,
श्री. मोतीलालसा कोल्हापुरे,
श्री. श्रीकांत कटारे, डॉ. पूजा यादव,
श्री. राजन चव्हाण व
सचिव संदिप चव्हाण

# कार्यकारिणी व विश्वस्त मंडळ पदाधिकारी



अध्यक्ष (फेब्रुवारी २००४ पर्यंत)
डॉ. प्रकाश भुर्जंगसा त्रिमल एम.बी.बी.एस.



अध्यक्ष (मार्च २००४ पासून)
श्री. गजानन अर्जुनसा शालगर



उपाध्यक्ष
श्री. अशोक लक्ष्मणसा रंगापुरे



सचिव
श्री. संदीप मोतीलालसा चव्हाण डी.सी.ई.



उपसचिव
श्री. राजेंद्र महादेवसा बदी



खजिनदार
श्री. राजेंद्र मनोहरसा झाड

## कार्यकारिणी सदस्य



श्री. राजेंद्र चव्हाण (हिशोब तपासनीस)



श्री. राजा भगवानसा पवार बी.ई.



श्री. राजेंद्र दत्तुसा हबीब



श्री. श्रीकांत कृष्णातसा कटारे



श्री. अनिल चंदुलालसा पवार



श्री. मोतीलाल सिद्रामसा कोल्हापुरे

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

## विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | श्री. गजाननसा अर्जुनसा शालगर | २४४५२४९३<br>२४३७२२२७ |
| उपाध्यक्ष | श्री. अशोकसा लक्ष्मणसा रंगापुरे | २४४७३९९८<br>२४३६७०८५ |
| सचिव | श्री. संदिप मोतीलालसा चव्हाण | २६४४२१९१ |
| उपसचिव | श्री. राजेंद्र महादेवसा बद्दी | २४२६९१४३ |
| खजिनदार | श्री. राजेंद्र मनोहरसा झाड | २४४७८६६९ |
| हि. तपासनीस | श्री. राजेंद्र दौलतरामसा चव्हाण | २६३४६७१० |
| सदस्य | श्री. राजा भगवानसा पवार | २४३३७६७८ |
| सदस्य | श्री. राजेंद्र दत्तुसा हबीब | २११९९३८९ |
| सदस्य | श्री. श्रीकांत कृष्णातसा कटारे | २४३१८४०० |
| सदस्य | श्री. अनिल चंदुलालसा पवार | २४४८४१६५ |
| सदस्य | श्री. मोतीलाल सिद्रामसा कोल्हापुरे | २६१२६६२९ |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल | २४२८३१८५ |
| श्री. प्रभाकरसा जनार्दनसा बाकळे | २४४७७९४०<br>२४३५०३९२ |
| श्री. मोहनसा विठ्ठलसा पवार | २४४५४५१९ |
| श्री. अंबुसा चंदुलालसा मेंगजी | २४४७२८५३<br>२६९६१२९१ |

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे

कार्यालय - ५७६, गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२. दूरध्वनी : २४४७२३४०, २४४३५६९५
उपकार्यालय - ४९७, घोरपडे पेठ, पुणे - ४११ ०४२.

## -० वार्षिक सर्वसाधारण सभा ०-

(फक्त सभासदांसाठी)

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक **६ सप्टेंबर २००४** रोजी टिळक स्मारक मंदीर सभागृह, एस. पी. कॉलेजशेजारी, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०, येथे सकाळी ठीक १०.०० वा. होणार आहे. समाजाच्या सर्व सभासद बंधूभगिनींनी या सर्वसाधारण सभेला वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

### -० सभेपुढील विषय ०-

१. दिनांक २५ एप्रिल २००२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२. सन २००२ ते २००४ चा ताळेबंद व हिशेब संमत करणे.

३. स्वारगेटच्या मोकळ्या जागेवरील विकास कार्याबद्दल.

४. स्वारगेट प्रकल्पाबाबत

५. ऑडीटरची नेमणूक.

६. समाजबांधवांचे ठराव व सूचना यावर चर्चा.

७. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस येणारे आयत्या वेळचे विषय.

सचिव
संदीप मोतीलालसा चव्हाण
डी.सी.ई.

# ✿ सभासदांना सूचना ✿

१. गणसंखेअभावी सभा न घेता आल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल व या सभेस गणसंख्यापूर्तीचे बंधन रहाणार नाही.

२. अहवालातील वृत्तांसंबंधी व ताळेबंद जमाखर्चाबद्दल कोणा सभासदास काही कागदपत्रे पहावयाची असतील त्यांनी दिनांक १/९/२००४ व २/९/२००४ रोजी सायं. ४ ते ७ या वेळांत लेखी अर्जासह संस्थेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

३. सभेस येताना अहवालाची आपली प्रत सोबत आणावी.

४. सभास्थळी प्रत्येक सभासदाने आपले नांव लिहून सही करणे आवश्यक आहे.

५. सर्वसाधारण सभेत कोणा सभासदास काही सूचना अगर ठराव मांडावयाचा असल्यास तशा सूचनेसह अगर ठरावासह तसा लेखी अर्ज संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक २/९/२००४ पर्यंत सकाळी १० ते १ व सायं. ४ ते ७ या वेळेत आणून देऊन त्या प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. फक्त संस्थेच्या कार्यासंबंधीच्या सूचनांचा/ठरावांचा यात विचार केला जाईल. कोणत्याही वैयक्तिक तक्रारींचा वा सूचनांचा/ठरावांचा यात विचार केला जाणार नाही. कार्यकारिणीच्या परवानगीने ही सूचना/ठराव सर्वसाधारण सभेत मांडला जाईल.

६. संस्थेच्या फक्त सभासदांनाच या सभेत भाग घेता येईल. प्रत्येक इच्छुक सभासदास आपले विचार मांडता येतील याची कृपया नोंद घ्यावी.

७. कृपया या सभेस लहान मुलांना आणू नये. त्याने सभेच्या कार्यात अडथळे येतात.

८. समाजहिताशी संबंधीत असेच प्रश्न मांडून त्यावर आटोपशीर चर्चा करावी. विषय अथवा विचारांची पुनरावृत्ती टाळून आम्हाला सहकार्य करावे, जेणेकरून सभेचा वेळ वाया न जाता जास्तीत जास्त सभासदांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल.

❑❑❑

# ✿ निवेदन ✿

आपल्या समाजाची गेली १२ वर्षे मन:पूर्वक सेवा करीत असलेले ट्रस्टचे मा. अध्यक्ष **डॉ. प्रकाश त्रिमल** यांनी त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ट्रस्टच्या अधक्षपदाचा राजीनामा दिला. कार्यकारिणीला तो जड अंत:करणाने स्विकारावा लागला. त्यांनी गेली १२ वर्षे केलेले ट्रस्टचे नेतृत्व विवादातीत होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी ट्रस्टच्या उत्पन्नवाढीसाठी विशेष प्रयत्न केले. या वाढीव उत्पन्नातूनच **'क्षत्रिय भवन'** हे अद्ययावत कार्यालय उभे राहिले. १९९५ साली त्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेले **महाराष्ट्र प्रांतिय अधिवेशन** हे तर उभ्या महाराष्ट्रापुढील आदर्श आहे. व्यापारी संघ व भिशी मंडळाच्या माध्यमातून गरजू समाजबांधवांना अर्थसहाय्यही करण्यात आले. स्वारगेट येथे भव्य प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने चार भू-भाडेकरुंविरुद्ध व एका बेकायदेशीर भाडेकरु विरुद्ध कोर्टात केसेस दाखल करुन प्रकल्प उभारणीतील मुख्य अडसर दूर करण्यासाठीची पायाभरणी केली. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे आतापर्यंत तीनजणांविरुद्धचे निकाल कोर्टात ट्रस्टच्या बाजूने लागले असून इतर दोन केसेसचीही सुनावणी चालू असून त्याही केसेसचा निकाल ट्रस्टच्या बाजूने लागण्याबाबत विश्वास वाटतो. पुणे ग्रामसभेत लोकशाही पद्धतीने - गुप्तमतदान पद्धतीने निवडणुका घेऊन निवडून आलेले अध्यक्ष म्हणून डॉ. त्रिमल संपूर्ण महाराष्ट्र समाजाला परिचित आहेत. आज ते ट्रस्टचे अध्यक्ष नसले तरी त्यांच्या अनुभवाचा उपयोग ट्रस्टचे सल्लागार या नात्याने आम्हांस वेळोवेळी होत असतो.

डॉ. त्रिमल यांच्या राजीनाम्यानंतर ट्रस्टच्या नेतृत्वाचा मोठा प्रश्न कार्यकारिणीसमोर होता. कार्यकारिणीमधील इतर कोणीही ट्रस्टचे अध्यक्षपद स्विकारण्यास नम्रतापूर्वक नकार दिला. खुर्चीसाठी भांडणाऱ्या आजच्या युगात हे एक दुर्मिळ उदाहरणच ठरावे. अशाप्रसंगी १९९२ ते २००२ असे दहा वर्षे ट्रस्टचे उपाध्यक्षपद सांभाळलेले परंतु स्वत:च्या कार्यव्याप्तीमुळे २००२ च्या निवडणुकीत अलिप्त राहिलेले **श्री. गजाननसा अर्जुनसा शालगर** यांना स्वत: डॉ. त्रिमल व सर्व कार्यकारिणीमंडळाने अध्यक्षपद स्विकारण्याची विनंती केली. सुरुवातीला त्यांनीही यासाठी नम्रतापूर्वक नकार दिला होता. परंतु व्यापक समाजहिताचा विचार करून व समाजबांधवांच्या व कार्यकारिणीच्या आग्रहाचा मान ठेवून त्यांनी अध्यक्षपद स्विकारण्यास मान्यता दिली. दि. २५/२/०४ रोजी कार्यकारिणीच्या बैठकीत घटनेतील कलम क्र. १७ अन्वये त्यांची कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

श्री. गजाननसा शालगर यांनी १९८७ साली स्वत:चे खर्चाने समाजातील सुमारे १०५ बटुंच्या मुंजी करुन दिल्या होत्या. त्यांचे वडील कै. अर्जुनसा शालगर यांनी स्वत: अनेक वर्षे पुण्याच्या समाजकार्यात सक्रिय राहून स्वत:चे आयुष्य वेचले. अशारितीने समाजकार्याची पिढीजात परंपरा असलेले अध्यक्ष पुणे ग्रामसभेस लाभले हे आपल्या समाजाचे मोठे भाग्य होय.

त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच मोठ्या धडाडीने कामकाजास सुरुवात केली आहे. त्यांच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय कार्य म्हणजे समाजबांधवांची वेळोवेळी घेतलेली बैठक व समन्वय समितीची स्थापना ! स्वारगेट प्रकल्प उभारणीचे डॉ. त्रिमलांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्ष साकारणे हे पुढील उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून नूतन अध्यक्षांनी व कार्यकारिणीने वाटचाल सुरु केली आहे. त्यास समाजबांधवांच्या सदिच्छा व श्री सहस्रार्जुन महाराजांचा आशीर्वाद पाठीशी असल्याने यश मिळणार याबाबत तीळमात्र शंका नाही.

- **अशोकसा लक्ष्मणसा रंगापुरे** (उपाध्यक्ष)

## ✿ अध्यक्षीय मनोगत ✿

सन्माननीय समाजबंधु भगिनिंनो,

श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे, या संस्थेचा २००२-२००३ व २००३-२००४ या कालावधीचा द्वैवार्षिक अहवाल समाजबांधवांस सादर करताना आम्हांस कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे. १२ मे २००२ च्या निवडणुकीनंतर प्रथमच हा आर्थिक हिशोबासह असलेला अहवाल सादर करीत आहोत.

दरवर्षी नियमित आयोजित केले जाणारे नवरात्रोत्सव, श्री सहस्रार्जुन जयंती, श्री हनुमान जयंती इ. धार्मिक उपक्रम व १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्र ध्वजारोहणाचे कार्यक्रम, मोफत वह्या-पुस्तके-गणवेष वाटप, पारितोषिक वितरण हे शिक्षणमंडळाच्या माध्यमातून राबविलेले शैक्षणिक उपक्रम तसेच हळदी-कुंकु व तिळगुळ वाटप इ. महिलामंडळाने राबविलेले उपक्रम हे सर्व कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहाने सर्व समाजबांधवांच्या उपस्थितीत साजरे केले. आणि याच कालावधीत ट्रस्टकडून प्रत्यक्ष गरजू समाजबांधवांना मदत होईल असे काही उपक्रम राबविले गेले व त्यांचा समाजबांधवांनी आवर्जून लाभ घेतला. ते उपक्रम म्हणजे **मोफत नेत्र चिकित्सा शिबिर व चष्मेवाटप, मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर, निराधार समाज बंधुभगिनींना मोफत अन्नधान्य-वस्त्र वाटप, निराधार विद्यार्थ्यांना इ. १२ वी पर्यंत मोफत शिक्षण, संगणक प्रशिक्षण वर्ग इत्यादि.**

वर उल्लेख केलेले नाविन्यपूर्ण व सद्यस्थितीत खरोखरीच आवश्यकता असणारे हे उपक्रम राबविताना आम्हाला कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. समाजाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी गेली अनेक वर्षे ट्रस्टकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले व या वाढीव उत्पन्नातूनच **'क्षत्रिय भवन'** ही वास्तु उभारण्यात आली. यानंतर प्रत्यक्ष गरजू समाजबांधवांपर्यंत पोहोचून त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न ट्रस्टकडून केले जात आहेत. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणजे वरील राबविलेले उपक्रम होत. या व्यतिरिक्त आणखीही अनेक उपक्रम पार पाडावयाचे आहेत. याबाबत समाजबांधवांकडून काही सूचना आल्यास त्यांचा आम्ही अवश्य विचार करु.

वरील सर्व उपक्रमांचा सविस्तर अहवाल पुढे येईलच. परंतु हे सर्व उपक्रम मोठ्या उत्साहाने राबवित असतानाच त्याची माहिती व हिशोबाचा ताळेबंद समाजबांधवांना दरवर्षी दिला गेला पाहिजे याबाबत दुमत नाही. परंतु इतर सर्व सामाजिक उपक्रमांना प्राधमिकता देत असताना सभेची तारीख ठरविण्यास थोडा उशीर झाला. दि. १ मार्च २००४ रोजी सर्व साधारण सभा ठरवून टिळक स्मारक मंदीराचे बुकींगही करण्यात आले होते. अहवाल छपाईचे काम अंतिम टप्प्यात असतानाच अचानकपणे मा. अध्यक्ष डॉ. त्रिमल यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर नूतन अध्यक्षांना पदभार घेण्यास थोडा कालावधी गेला. त्यावेळी कार्यकारिणीने दुसऱ्या आर्थिक वर्षाचा एकच महिना शिल्लक असल्याने दोन्ही वर्षाचा अहवाल एकत्रित देण्याचा निर्णय घेतला. ज्यायोगे दोनदा होणारा कार्यालय बुकींग खर्च व अहवाल छपाई खर्चही वाचविता येईल. वरील सर्व अपरिहार्य कारणांमुळे आम्हाला यावेळी द्विवार्षिक अहवाल सादर करावा लागत आहे याबद्दल कार्यकारी मंडळाचे वतीने मी दिलगिरी व्यक्त करतो.

ट्रस्टचे दैनंदिन कामकाज चालवित असताना अनेक छोट्या मोठ्या अडचणी येत असतात व त्यावर मात करुन प्रसंगी स्वतःचा वेळ व पैसा खर्च करुन मार्ग काढावा लागतो. परंतु हे सर्व कार्य करीत असताना संपूर्ण समाज आमच्या पाठीशी आहे, ही एक भावना आमचे नीतीधैर्य वाढवीत असते. निवडणुकीच्या माध्यमातून समाजबांधवांनी आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे याबद्दल ही कार्यकारिणी पुणे ग्रामसभेतील सर्व समाज बंधु-भगिनींची ऋणी आहे.

पुणे ग्रामसभा गुप्त मतदानाद्वारे कार्यकारिणीची निवड करते ही आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. पुणे ग्रामसभेतील सर्व मतदार या साठी निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत, यात दुमत नाहीच. परंतु अनेक वर्षांच्या अनुभवातून असे निदर्शनास येत आहे की, पुणे ग्रामसभेचे समाज बंधु-भगिनी ट्रस्टच्यावतीने दरवर्षी समाजात होणाऱ्या उपक्रमांना आवर्जून उपस्थित रहात नाहीत. विशेषतः गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, श्री सहस्रार्जुन जयंती, शिक्षण मंडळ बक्षिस समारंभ, महिला मंडळाचे कार्यक्रम तसेच ट्रस्टच्या सर्वसाधरण सभेस देखील म्हणावी अशी उपस्थिती नसते.

संपूर्ण वर्षात ५/६ दिवस समाज बंधु-भगिनींना दिवसातील ३-४ तास समाजाच्या उपक्रमांना वेळ देता येत नाही याचा काय अर्थ काढावा ?

समाजाच्या उन्नतीसाठी समाजातील सर्व थरातील समाज बंधु-भगिनी, युवक-युवतींनी समाजाच्या सर्व उपक्रमात भाग घेण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः सधन व व्यापारी समाज बांधवांनी आमच्या या व्यथेकडे लक्ष द्यावे, ही नम्र विनंती. समाजातील सर्व थरातील सर्व समाज बंधुभगिनींनी कसलाही संकोच न बाळगता सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेऊन कार्यकर्त्यांना प्रोत्साहन द्यावे, बळ द्यावे, आमचा उत्साह वाढवावा अशी आमची माफक अपेक्षा आहे.

आपल्याला दरवर्षीचे ठराविक उपक्रम राबवून थांबायचे नाही तर स्वारगेट येथील जागेत भव्य इमारत उभी करावयाची आहे. त्यासाठी भुभाडेकरुंकडे असलेली जागा ताब्यात घेण्यासाठी कोर्ट प्रकरणेही योग्य तऱ्हेने हाताळायची आहेत. या व इतर अनेक कामाकरीता आपला सक्रीय पाठींबा अत्यंत आवश्यक आहे. आपल्या सक्रीय पाठींब्यातूनच सक्रीय कार्यकर्त्यांची फळी उभी करावयाची आहे.

या सर्व साधारण सभेत मांडावयाच्या ठरावांची माहिती, मागील दोन वर्षांचा ताळेबंद व जमाखर्च तसेच उपसंस्थांच्या कार्याचा आढावा, काही निवेदने, आवाहने या अहवालात दिलेली आहेत. या सर्वांचा आपण नीट अभ्यास करुन चर्चेत भाग घ्यावा, आपली मते व योग्य त्या सूचना मांडाव्यात.

आम्ही आमच्या परीने ट्रस्टचा कारभार योग्य तऱ्हेने चालविण्याचा प्रयत्न करतो, हे करताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतात, काही मतभेद निर्माण होतात, आमचे हातूनही काही चूका नकळत होत असतील, या सर्वांतून सुवर्णमध्य काढीत सर्वांना बरोबर घेऊन आम्हाला हे समाजकार्य चालू ठेवावयाचे आहे.

ही कार्यकारिणी आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे व पूर्ण पारदर्शकता बाळगून पार पाडीत राहील असा विश्वास कार्यकरिणीच्या वतीने मी आपणापुढे व्यक्त करतो.

धन्यवाद !

गजानन अर्जुनसा शालगर
अध्यक्ष

# ❁ विशेष सत्कार ❁

आपल्या समाजातील ज्यांनी क्रिडा, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे त्यांचा ट्रस्टतर्फे या सर्वसाधारण सभेत सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये पुढील समाजबांधवांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

## मा. डॉ. दत्ता वाळवेकर

'क्षात्रबोली' पुस्तक लेखन

## कु. दिनानाथ दत्तोबा कटारे

पुणे ते दिल्ली सायकल प्रवास

## सोहन माणिकसा दलभंजन

टेनिसमध्ये राज्यपातळीवर खेळल्याबद्दल

## मा. कृष्णातसा सगनसा कटारे

श्री डोंगराई देवस्थानला (कडेगाव) रु. १,११,१११/- देणगी दिल्याबद्दल

## डॉ. सौ. शुभांगी वाळवेकर

मॅनेजमेंट विषयावर डॉक्टरेट (पीएच.डी.) मिळविल्याबद्दल

## कु. पुनम अंकुश कोल्हापुरे

पुणे जिल्हा कबड्डी संघात लागोपाठ २ वर्षे निवड

वरील समाजबांधवांव्यतिरीक्तही इतर कोणी उल्लेखनीय कामगिरी केली असल्यास कृपया त्यांची माहिती कार्यालयात कळविण्यात यावी ही विनंती, त्यांचाही सत्कारार्थी मध्ये समावेश केला जाईल.

# ✿ सर्वसाधारण सभेपुढील ठराव व विषय ✿

• विषय क्र. १ : या आधीची सर्वसाधारण सभा दि. २५ एप्रिल २००२ रोजी झाली. सदरील सभेचा वृत्तांत सभेच्या दिवशी सभागृहात वाचण्यात येईल. तो वृत्तांत कायम करणेबाबत.

• विषय क्र. २ : सन २००२ ते सन २००४ चा ताळेबंद व हिशोब संमत करणे. अहवालात सन २००२ ते २००४ चा संपूर्ण ताळेबंद व हिशोब तपशीलवार दिलेला आहे. ताळेबंद व हिशोब सभासदांना पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात दोन दिवस ठेवण्यात आले आहेत. याबद्दल सभासदांच्या शंकांचे निरसन कार्यालयातच, कार्यालयीन वेळेत करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

• विषय क्र. ३ : स्वारगेटच्या मोकळ्या जागेवरील विकास कार्याबाबत :-

संस्थेची स्वारगेट येथे एकूण २९ गुंठे जागा होती. आत्तापर्यंत ४ वेळा रस्तारुंदी होऊन जवळ जवळ ८-९ गुंठे जागा कमी झालेली आहे. स्वारगेटच्या राहीलेल्या मोकळ्या जागेची सुधारणा काही प्रमाणात करण्यात आलेली आहे. स्वारगेटला मोठी तीन मजली इमारत, विष्णु मंदीर, देवीचे मंदीर, चार भू-भाडेकरु आहेत. तरीही संस्थेच्या ताब्यात बरीच मोकळी जागा आहे. इतके दिवस निधी अभावी या जागेचा विकास होऊ शकला नाही. या मोकळ्या जागेवर फरशी टाकून स्वयंपाक खोली, मोरी, पाण्याची व्यवस्था इ. सोयी केल्या तर ही जागा समाजाच्या सांस्कृतिक कार्याकरिता वापरता येईल. परंतु त्यासाठी सदरील जागेवर वरील सोयी कराव्या लागतील. मोकळ्या जागेवर जाड फरशीचे अच्छादन व पी.सी. सी. करुन घ्यावे लागेल. हे काम आपण स्वत: सर्व साहित्य खरेदीकरून, मजुरीने करुन घेणार आहोत. कारण यात मालाचा दर्जा चांगला रहातो. चार ठिकाणी चौकशी करुन साहित्य आणता येते, त्यात काही बचत होते. कामाचा दर्जा चांगला रहातो. अंदाजे खर्च सव्वा ते दिडलाख रु. होणार आहे. निधीच्या उपलब्धतेप्रमाणे टप्प्या टप्प्याने हे काम पूर्ण करता येईल. तरी वरील ठरावास सभेने मान्यता द्यावी.

• विषय क्र. ४ : स्वारगेट प्रकल्पाबाबत :-

सर्व समाजबांधवांस कल्पना आहेच की आपल्या पुणे ग्रामसभेतील समाजबांधवांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे हे शैक्षणिक व व्यापारी शहर असल्याने परगावाहून पुण्यात येऊन स्थायिक होणाऱ्या

समाजबांधवांची संख्या मोठी आहे. यासर्व समाजबांधवांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. स्वारगेट येथे सुदैवाने आपल्या समाजाची मोठी जागा उपलब्ध आहे. तेथील ४ भूभाडेकरुंच्या ताब्यात असलेली जागा ट्रस्टच्या ताब्यात मिळावी यासाठी कोर्टात दाखल केलेल्या दाव्यांचे निकाल ट्रस्टच्या बाजूने लागत आहेत.

स्वारगेट प्रकल्पामध्ये सुसज्ज मंगल कार्यालय, व्यायाम शाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ट्रस्ट व सर्व उपसंस्थांची कार्यालये, नवीन एकत्रित भव्य मंदीर व सांस्कृतिक हॉल अशी योजना आहे. प्रकल्पाच्या कामाचा व्याप मोठा असल्याने त्यासाठी एक ट्रस्टच्या अंतर्गत बांधकाम समिती व त्या अंतर्गत इतर उपसमित्या उदा. निधी उभारणी समिती, म.न.पा. नकाशा मंजुरी समिती इ. स्थापन कराव्या लागतील. त्याचप्रमाणे नकाशामंजुरीसाठी म.न.पा.स भरावे लागणाऱ्या टॅक्सची रक्कम ही आम्हांस असलेल्या रु. ५०,०००/- च्या अधिकारापेक्षा मोठी असू शकते. तरी यासंबंधी सर्व समित्या नेमणे व नकाशा मंजूरी व इतर अनुषंगिक कामे जी स्वारगेट प्रकल्पासाठी करणे आवश्यक आहेत ती करण्याचा व तिच्या खर्चासाठी समाजबांधवांनी ट्रस्टला आवश्यक ते अधिकार मंजूर करावेत.

- विषय क्र. ५ : ऑडिटरची नेमणूक करणे.

- विषय क्र. ६ : समाज बांधवांचे ठराव व सूचना यावर चर्चा.

- विषय क्र. ७ : अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस येणारे आयत्या वेळचे विषय.

# ✿ कार्याचा आढावा ✿

### मोफत नेत्र चिकित्सा शिबिर व चष्मे वाटप :

रविवार दि. २० ऑक्टोबर २००२ रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी गरजू समाज बांधवांसाठी मोफत नेत्रचिकित्सा शिबिर व चष्मेवाटप कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास चिरंतन मेडीकल फौंडेशनच्या संचालिका डॉ. वर्षा वाळवेकर, नेत्रतज्ज्ञ यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमाचा समाजातील सुमारे ३०० समाजबांधवांनी लाभ घेतला.

### मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर :

श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्टने विजया फौंडेशनच्या सहकार्याने रविवार दि. २४/८/०३ रोजी क्षत्रिय भवन येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचे उद्‌घाटन मा. आमदार दिपकजी पायगुडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. सौ. पूजा यादव, फौंडेशनच्या अध्यक्षा विजया देव उपस्थित होते. डॉ. मंदार देव, डॉ. नताशा देव, डॉ. विद्या पाटील यांनी तपासणी केली. या शिबिराचे संयोजन आपले कार्यकारिणी सदस्य श्री. मोतीलालसा कोल्हापुरे यांनी त्यांचे वडील कै. सिद्रामसा कोल्हापुरे व मातोश्री कै. राधाबाई कोल्हापुरे यांच्या स्मरणार्थ केले. या शिबिराचा फायदा सुमारे ४०० गरजुंनी घेतला. शिबिरात हृदयरोग, रक्तगट, स्त्रीरोग, बालरोग इ. तपासणी केली गेली.

### सार्वजनिक मौंजीबंधन कार्यक्रम :

श्री सहस्रार्जुन प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या सार्वजनिक मौंजीबंधन उपक्रमात ट्रस्टने सक्रिय सहभाग घेतला. ट्रस्टतर्फे सर्व बटुंना गणवेष देण्यात आला तसेच सर्व कार्यकारिणी मंडळ सदस्यांतर्फे बटुंना चांदीची अंगठी सप्रेम भेट देण्यात आली. कार्यकारिणी सदस्य श्री. मोतीलालसा कोल्हापुरे यांनी वैयक्तिक रु. २१,०००/- देणगी दिली. प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. त्याबद्दल ट्रस्टतर्फे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विजय कोल्हापुरे, उपाध्यक्ष श्री. अनिल वाळवेकर, सचिव श्री. मेघशाम झाड व इतर सर्व कार्यकारिणी सदस्यांचे व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

### कोर्ट प्रकरणे :

मागील अहवालात नमूद केल्याप्रमाणे संस्थेची एकूण सहा कोर्ट प्रकरणे चालू आहेत. आनंदाची गोष्ट अशी की भारत पेट्रोलियमविरुध्दचा दावा आपण हायकोर्टातदेखील जिंकलेला आहे. त्यांच्या विनंतीनुसार व आपल्या संमतीने हायकोर्टाने त्यांना फक्त तीन वर्षे मुदतवाढ दिली. ती दिली नसती तर प्रकरण सुप्रिम कोर्टात जाऊन १०-१५ वर्षे रखडले असते. सन २००६ च्या सुरुवातीला ही जागा संस्थेच्या ताब्यात येईल. आम्ही गेली १२ वर्षे चिकाटीने केलेल्या प्रयत्नांचे हे फळ आहे. श्री. शर्मा यांच्या गोडाऊनबाबतचा निकालही लघुवाद न्यायालयाने ट्रस्टच्या बाजूने दिला आहे. लवकरच बाकीच्या दाव्यांचा निकाल लागेल.

### श्री मारुती मंदीराच्या पर्यायी जागेबद्दल :

रस्तारुंदीत श्री मारुती मंदीर गेल्यापासून पर्यायी जागा मिळावी म्हणून आपण प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी

नगरसेवक व राजकारणी यांच्यामार्फत प्रयत्न चालू आहेत. आपला समाज इतर समाजांच्या तुलनेने अल्प असल्यामुळे फारसा राजकीय प्रभाव पडत नाही. स्थानिक राजकारणातही आपला प्रभाव नाही. त्यामुळे विलंब होत आहे. तरीही वेळ पडल्यास उपोषणास बसणे, मोर्चा काढणे इ. साठी जास्तीत जास्त समाजबांधवांनी यात भाग घेऊन महानगरपालिकेवर दडपण आणावे लागेल.

**निराधारांसाठी सहाय्य योजना :**

या योजनेअंतर्गत समाजातील निराधार, वृद्ध व्यक्तींना आपण दरमहा धान्य, मानधन व कपडे या स्वरुपात मदत करीत आहोत.

या योजनेअंतर्गत १५ लाभार्थींना सहाय्य होते. प्रत्येक व्यक्तीस दरमहा ५ किलो गहू, ५ किलो तांदुळ, २ किलो साखर, १ किलो तेल, १ किलो तूरडाळ व १०० रु देण्यात येते. तसेच दर ३ महिन्यांनी साडी/धोतर देण्यात येते आत्तापर्यंत वस्तूरुपाने अथवा रोख रक्कम देऊन समाजबांधवांनी या योजनेसाठी बहुमूल्य सहाय्य केलेले आहे.

समाजात आणखीही बरेच गरजू आहेत. या योजनेस सर्वच सधन समाजबांधवांनी पुढे येऊन मदतीचा हात दिल्यास या निराधारांचे जीवन सुसह्य होईल. समाजासाठीचे एक नैतिक उत्तरदायीत्व म्हणून सर्वच सधन बांधवांनी कार्यालयात येऊन आपला मदतीचा भरघोस प्रतिसाद द्यावा, अशी नम्र विनंती कार्यकारिणीकडून करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र प्रांतीय सभेची बैठक :**

महाराष्ट्र प्रांतीयचे अध्यक्ष श्री. टिकले सर यांच्या विनंतीवजा आदेशावरून दि. ५ जाने २००३ रोजी सहस्रार्जुन भवन येथे महाराष्ट्र प्रांतीय सभेची अर्धवार्षिक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस भरपूर प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रांतीय बैठक आपल्या ठिकाणी घेणे हे महाराष्ट्रातील सर्व सधन ग्रामसभांचे नैतिक उत्तरदायीत्व आहे. आर्थिक दृष्ट्या कुमकुवत अथवा अगदी लहान ग्रामसभांना अशा बैठका घेणे शक्य होत नाही. पुणे, सोलापूर, मुंबई, ठाणे, नाशिक, संगमनेर, सातारा, कोल्हापूर, कऱ्हाड, मानवत, वसमत, भिवंडी, इ. ग्रामसभेत समाजबांधव जास्त संख्येने आहेत. अशा ग्रामसभांनी प्रांतीयच्या बैठका घेतलेल्या आहेत. महाराष्ट्र प्रांतीयचे अधिवेशन संगमनेर ग्रामसभेने घ्यावे असे ठरले आहे. त्यासाठी नुकतीच सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

**संस्थेची वर्षभरातील उत्सवादी कार्ये :**

नेहमीप्रमाणे संस्थेने वर्षभरातील धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पाडले. शिक्षण मंडळ, पतपेढी, महिला मंडळ व युवक संघटना यांचेही कार्यक्रम त्यांच्या कार्यक्षेत्रात पार पडले. त्याचे विवेचन पुढे आहेच.

धार्मिक कार्यक्रमात प्रामुख्याने श्री सहस्रार्जुन जयंतीचा कार्यक्रम व नवरात्र उत्सव येतात. जयंतीचा कार्यक्रम मिरवणूक, महाप्रसाद, यासह उत्साहाने पार पडला. तसेच वाढत्या संख्येने नवरात्र उत्सव व कोजागिरी पौर्णिमा पार पडले. सहस्रार्जुन भवनात ज्यांची समाधी आहे ते परमपूज्य श्री सुभाननाथ महाराज व श्री पर्वतगिरी महाराज यांचे उत्सव साजरे केले. श्री रामनवमी, श्री हनुमान जयंती हे धार्मिक कार्यक्रम तसेच १५

ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन व २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन ध्वजारोहणाने साजरे केले. याही कार्यक्रमांना समाज बांधवांची उपस्थिती वाढावी ही अपेक्षा.

**संस्थेच्या उपसंस्था :**

शिक्षण मंडळ, पतपेढी व महिला मंडळ यांच्याकडून आलेल्या त्यांच्या कार्याचा आढावा पुढे येईलच. पतपेढीखेरीज सर्व उपसंस्थांना ट्रस्ट आर्थिक सहाय्य देते. मागील आर्थिक सहाय्याचा आढावा खालीलप्रमाणे -

| | उपसंस्था | एप्रिल २००२ ते मार्च २००३ | एप्रिल २००३ ते मार्च २००४ |
|---|---|---|---|
| १) | शिक्षण मंडळ | रु. ७४,१६६.०० | रु. ६०,२२९.०० |
| २) | महिला मंडळ | रु. ५,०५५.०० | रु. ७,७२०.०० |

**वधू-वर सूचक मंडळ :**

श्री. राजेंद्र दौलतरामसा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हे कार्य व्यवस्थित चालू आहे. विशेषकरून परगांवच्या वधूवरांच्या पालकांना त्यांची फारच मदत होते. यासाठी त्यांनी बऱ्याच युवक युवतींची पत्रिका व फोटोसह संपूर्ण माहिती संग्रही ठेवली आहे. पुण्यातील व परगावची बरीच लग्ने त्यांच्या मार्गदर्शनामुळे होऊ शकली आहेत. पुण्यातील आणखी एक समाजबांधव श्री. मोहनसा पवार हे देखील स्वतंत्रपणे लग्ने जुळविण्यासाठी सहाय्य व मार्गदर्शन करतात.

**श्री. राजेंद्र चव्हाण** — ९४२२० १६८८०, २६३४६७१०

**श्री. मोहनसा रामचंद्र पवार** — मो. ५५५०४५४४

**विशेष सहकार्य :**

समाजातील व्यक्तीच्या दुःखद निधनानंतरच्या अंत्य संस्कारासाठी खालील समाज बांधवांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. याबद्दल ट्रस्ट त्यांचे आभारी आहे.

**श्री. तुकारामसा भीमरावसा मेंगजी** — ९८९०९ २८२५०

**श्री. मोहनसा रामचंद्रसा पवार** — मो. ५५५०४५४४

**श्री. बाबुरावसा हबीब**

**इतर कार्ये :**

क्षत्रिय भवन, गुरुवार पेठ, येथे तिसऱ्या मजल्यावर नियमाप्रमाणे बांधकाम करून अर्धी गच्ची मोकळी आहे. यावर बांधकामास परवानगी मिळावी म्हणून पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडे कार्यकारिणी सदस्य श्री. राजा पवार यांच्यामार्फत कागदपत्रे दाखल केली आहेत. ही परवानगी मिळाली तर ५०० ते ६०० चौ. फुटांचे वाढीव बांधकाम होईल. यात महिला मंडळ, शिक्षण मंडळ व युवक संघटना यांच्यासाठी स्वतंत्र सोय करता येईल. निधीच्या उपलब्धतेनुसार हे कार्य आपणांस करावयाचे आहे.

- संस्थेचे प्रमुख कार्यालय क्षत्रिय भवन, गुरुवार पेठ येथील सर्व कागदपत्रांचे व फाईलींचे पुनर्वर्गीकरण करुन व्यवस्थीत ठेवण्यात आली.
- स्वारगेट येथील मुख्य इमारतीचा दर्शनी भाग, स्वारगेट हॉल व श्री विष्णु मंदीर यांचे रंगकाम करण्यात आले.

- स्वारगेटच्या पटांगणात बराच राडारोडा साठला होता. तो हलवून पटांगण स्वच्छ केले. जेणेकरून तेथे पी. सी. सी. करावयाचे ठरले तर सोईचे होईल. तसेच मोरीच्या भिंतीची व काही ठिकाणच्या संरक्षक भिंतीची उंची वाढविण्यात आली. काही ठिकाणी भींत बांधली. लग्नकार्य व इतर कार्यासाठी व्यासपीठ बांधण्यात आले.

- स्वारगेट येथील जिन्याखालील जागा मोकळी करुन, स्वच्छ करुन रंगकाम व दुरुस्ती केली. त्या जागेचे सुंदर अशा उपकार्यालयात रुपांतर करुन तेथे उपकार्यालय चालू केले. सहस्रार्जुन सभागृहाचे बुकींग वाढावे म्हणून हा प्रयत्न आहे.

- जरुर तेथील वायरींग बदलले वा दुरुस्त करुन घेतले. सहस्रार्जुन सभागृहासाठी ५० खुर्च्या घेण्यात आल्या. हॉलमधील बाल्कनीस लोखंडी दार बसवून स्टोअररुम बनविण्यात आली.

**विशेष आवाहन :**

समाजबांधवांच्या छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांना उपयोगी पडावे म्हणून व्यापारी संघ व तत्सम एका मंडळामार्फत गरजू समाजबांधवांना आपण अर्थपुरवठा करतो व त्यासाठी दोन योजना आपण चालवितो. हेतु हा की गरजेनुसार मागणी केल्याबरोबर त्वरीत निधी उपलब्ध व्हावा. दुर्दैवाने या दोन्ही योजनांमध्ये बरेच थकबाकीदार आहेत. वारंवार प्रयत्न करुनही त्यांच्याकडून हा निधी परत जमा होत नाही. या कार्यात खंड पडल्यामुळे गरजू बांधवांना निधी देता येत नाही. येत्या ६ महिन्यात सर्व थकबाकीदारांकडून थकबाकी वसूल करण्यात येणार आहे. निधीची थकबाकी तरीही राहीली तर नाईलाजाने पुढील सर्व साधारण सभांमध्ये अशा थकबाकीदारांची नावे जाहीर करण्यात येतील. याची गंभीर नोंद थकबाकीदारांनी घ्यावी व सहकार्य करावे.

## ✿ समन्वय समिती ✿

आपल्या ट्रस्टच्या कार्याच्या मोठ्या व्याप्तीमुळे कामात सुसूत्रता आणण्यासाठी ट्रस्टच्या अंतर्गत विविध उपसंस्था कार्यरत आहेत. उदा. शैक्षणिक कामकाजासाठी शिक्षण मंडळ, महिला उपक्रमांसाठी महिला मंडळ, युवक उपक्रमांसाठी युवक संघटना इ. या सर्व उपसंस्थांचे कामकाज सुरळीतपणे पार पडावे व या सर्व उपसंस्थांच्या उपक्रमांची माहिती ट्रस्टला व इतर उपसंस्थांना व्हावी तसेच अडीअडचणींची देवाण-घेवाण होऊन सुसंवाद साधला जावा या हेतूने ट्रस्टने एक समन्वय समिती स्थापन केली आहे. या समन्वय समितीने वेळोवेळी उपसंस्थांच्या बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे व त्यांच्या काही अडीअडचणी असल्यास त्या ट्रस्टच्या सहकार्याने सोडविण्याचा प्रयत्न करावा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

## ✿ समन्वय समिती ✿

श्री. शशिकांतसा रामकृष्णसा मैत्राणी

श्री. रामासा ईश्वरसा झाड

श्री. अशोकसा विठ्ठलसा चव्हाण

श्री. श्रीकांत शंकरसा शालगर

श्री. विठ्ठलसा गोविंदसा कमलापुरे

श्री. बाळासाहेब हिरालालसा झाड

श्री. हेमंत चंद्रकांतसा खेरुड

# श्री सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळ, पुणे

## -० कार्यकारी मंडळ ०-

| | | |
|---|---|---|
| अध्यक्षा | : | सौ. प्रमिला वामनसा पवार |
| उपाध्यक्षा | : | सौ. सुचित्रा सुनिलसा वाळवेकर |
| सचिव | : | सौ. सुरेखा दिलीपसा चव्हाण |
| उपसचिव | : | सौ. शशिकला सुनिलसा झाड |
| खजिनदार | : | सौ. आशा संतोषसा चव्हाण |
| सदस्य | : | सौ. पुष्पा अशोकसा वखारे |
| सदस्य | : | सौ. शोभा चंद्रकांतसा काटवे |
| सदस्य | : | सौ. वंदना हिरालालसा धोंगडी |
| सदस्य | : | सौ. विद्या नरेंद्रसा कुक्कर |
| सदस्य | : | सौ. शशिकला नारायणसा आरसिद्ध |
| सदस्य | : | सौ. विजया मदनसा बोजगीरे |

## -० सल्लागार ०-

श्रीमती माया डोंगरसा वाळवेकर

सौ. मीना दिलीप वाळवेकर — सौ. चंद्रकला बाळासाहेब झाड

सौ. स्मिता गोपाळकृष्ण जितुरी — सौ. गीता जवाहरसा धोंगडी

---

महिला मंडळातर्फे सर्व प्रकारचे

पापड, लोणचे, मिरची पावडर व धनीया पावडर

विक्री चालू आहे.

# श्री सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळ, पुणे

सन्माननीय समाज बंधु आणि भगिनींनो, सप्रेम नमस्कार,

आपणांस हे सांगण्यास आम्हाला अभिमान वाटतो की, आम्ही विविध कार्यक्रम स्वारगेट येथे घेतो. २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टला सकाळी ८ वाजता झेंडावंदन असते. झेंडावंदनाला महिलांची उपस्थिती असते. २६ जानेवारीला संक्रांत निमित्त समाज बांधवांसाठी तिळगुळ आणि महिलांसाठी हळदी-कुंकू हे कार्यक्रम असतात. या मध्येच महिला मंडळाने ठरविलेला कार्यक्रम म्हणजे ज्यांनी नातसून पाहिली असेल त्या आजींचा व २५ वर्षे एकत्रित असलेल्या कुटुंबांचा सन्मान करण्यात येतो.

त्यानंतर महाशिवरात्री येते त्यादिवशी संध्याकाळी ६ वा. 'ॐ नमः शिवाय' चा १०८ जप आणि ८ मार्च रोजी महिलादिन साजरा करण्यात येतो. श्री रामनवमी दु. १२ वा. साजरी करण्यात येते. नंतर आषाढी आरती व नैवेद्य पौर्णिमा झाल्यावर पहिल्या मंगळवारी दु. १ वा. करण्यात येते. नागपंचमीला संध्याकाळी ६ वा. नागाची प्रतिकृती काढून पूजा करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे श्रावणी तिसऱ्या शुक्रवारी संध्या ६ वा. हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम असतो. गोकुळ अष्टमी रात्री १२ वा. साजरी करण्यात येते. नवरात्रामध्ये ५ व्या माळेला भोंडला होतो आणि खिरापत वाटली जाते. ९ दिवस रोज रात्री ९ ते १२ दांडिया खेळला जातो. या महिला मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती असते. या कार्यक्रमाला येणारा खर्च आम्हा महिला मंडळाला ट्रस्टकडून देण्यात येतो.

विशेष कार्यक्रमाबाबत विशेष म्हणजे यावर्षी पुणे समाज महिला मंडळाने प्रथमच रामनवमी दिवशी बाळांचे सामुहीक बारशे करुन दिले, भंडारा केला. या महाप्रसादाचा लाभ बरेच समाज बांधव व भगिनींनी घेतला. मोठ्या थाटात बाळांचे ''नामकरण विधी'' पार पडले. त्यास प्रतिसाद चांगलाच लाभला.

क्षत्रिय भवन गंज पेठ येथे दर शनिवारी सायं. ५ ते ६ बाल संस्कार केंद्र चालू आहे. वयोगट ४ ते १०. बाल संस्कार केंद्रात मुलांना दुध व खाऊ वाटप सुद्धा होते. महिलांची संघटना वाढविण्याचा विचार आहे. विविध कार्यक्रम राबविण्याचा विचार आहे. जसे शिवणक्लास, मेहंदी क्लास, योगासन वगैरे यासाठी समाजातील महिलांनी वरील उपक्रमांना उपस्थित राहून सक्रिय सहभाग घ्यावा, ही विनंती.

**सौ. प्रमिला वामनसा पवार**
अध्यक्षा

# ✿ शिक्षण मंडळ कार्यकारिणी ✿

| | |
|---|---|
